IndiaFirst
LIFE INSURANCE

**Publication: Sakal** **Date: Monday, 11th April, 2016**

**Edition: Mumbai**

# विम्यातील जोखीम

आर. एम. विशाखा

मागील लेखात आपण गुंतवणुकीच्या दृष्टीने आयुर्विम्याचे महत्त्व जाणून घेतले. आयुर्विमा नेमका कधी घ्यावा आणि त्यातील जोखीम काय? याविषयी आज आपण जाणून घेऊ.



आयुर्विमा पॉलिसी घेताना तुमचे वय, जोखीम व संरक्षण या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. उत्पन्नातून खर्च वजा करता, जी काही शिल्लक राहील त्यातून प्रत्येक जण छोटी-मोठी गुंतवणूक करतो; मात्र आयुर्विमा हीही एक गुंतवणूकच आहे.

विमा पॉलिसी घेताना ग्राहकाचे वय व जोखीम यानुसार पॉलिसी घेता येते. काही विमा योजना या खात्रीशीर परतावा देतात. शेअरबाजाराशी संलग्न (मार्केट लिंक्ड) योजनाही बाजारात उपलब्ध आहेत. ज्यामध्ये काही वेळा अपेक्षेपेक्षा चांगला परतावा मिळतो; तर काही वेळा विमाधारकाला पॉलिसीच्या अखेरीस किमान परताव्यापेक्षाही कमी परताव्यावर समाधान मानावे लागते. त्यामुळे मार्केट लिंक्ड योजनांमध्ये परताव्यासंबंधी जोखीम अधिक असते. याचे मुख्य कारण म्हणजे मार्केट लिंक्ड योजनांमधील गुंतवणूक परतावा शेअर बाजाराच्या कामगिरीवर अवलंबून असतो. दीर्घ कालावधीसाठी आयुर्विमा हा स्थिर व सुरक्षित गुंतवणुकीचा सर्वोत्तम पर्याय आहे. परताव्याची हमी देणाऱ्या, कमी जोखमीच्या विमा योजनांमध्ये एन्डॉवमेंट प्लॅन, कॅश बॅक प्लॅन, डिफर्ड पेन्शन प्लॅन, गॅरंटेड रिटायरमेंट प्लॅन यांचा समावेश आहे. या योजनांमध्ये विमा कंपन्यांकडून वर्षाच्या अखेरीस परतावा जाहीर केला जातो. मध्यम स्वरूपातील जोखमीच्या विमा योजना अर्थात युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन्सही बाजारात उपलब्ध आहेत; ज्यातून सरकारी रोखे आणि कॉर्पोरेट बॉंडमधून मिळणाऱ्या परताव्याप्रमाणे रिटर्न मिळतो. यातील गुंतवणूक इक्विटी व डेट फंडात केली जाते.

शेअर्समधील गुंतवणूक काही कालावधीनंतर रोख्यांमध्ये हस्तांतर करण्याचा पर्याय काही युनिट लिंक्ड प्लान्समधून विमाधारकाला दिला जातो. एखाद्या ग्राहकाची परताव्यासंबंधी उच्च जोखीम घेण्याची तयारी असल्यास त्यासाठी 'युनिट लिंक्ड इक्विटी पॉलिसी इन इक्विटी फंड' ही विमा योजना फायदेशीर ठरते. यामध्ये विमा संरक्षण तर मिळतेच; शिवाय प्रीमियममधील जास्तीत जास्त गुंतवणूक शेअर्समध्ये गुंतवण्यात येते. काही विमा योजना या ७ ते २० वर्षे कालावधीसाठी असतात; तर काही कंपन्यांकडून एकाच वेळी प्रीमियम घेऊन विमा दिला जातो. त्यामुळे प्रत्येकाला विमा पॉलिसी स्ट्रक्चर ठरवण्याचीही संधी आहे. मुलांच्या शिक्षणासाठी २० वर्षांची दीर्घकालीन विमा पॉलिसी फायदेशीर ठरू शकते. तसेच १० वर्षे प्रीमियम भरून २० वर्षे विमा संरक्षण मिळवण्यासाठी मर्यादित प्रीमियमची विमा पॉलिसी घेता येऊ शकते.

**लेखिका इंडियाफर्स्ट लाईफ इन्शुरन्स या कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक आहेत.**

A Joint Venture of
Bank of Baroda Legal & General Andhra Bank